25 APR 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आनंदराव नाईक कॉलेज ठरले विजेता

## नियतकालिक स्पर्धा : व्यावसायिक गटात घोडावत इन्स्टिट्यूशन्स प्रथम

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठातर्फे झालेल्या नियतकालिक स्पर्धेत बिगर व्यावसायिक गटात सर्वसाधारण विजेता पुरस्कार देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् अँन्ड सायन्स कॉलेज (चिखली, ता. शिराळा, जि. सांगली) यांच्या 'अमर' (संपादक डॉ. प्रकाश दुकळे) या नियतकालिकाने, तर व्यावसायिक गटात सुशीला दानचंद घोडावत चॅरिटेबल ट्रस्टच्या संजय घोडावत ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स (अतिग्रे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) यांच्या 'उमंग' (संपादक योगेश धुळुगडे) नियतकालिकाने प्रथम क्रमांक पटकाविला.




**कोल्हापूर : नियतकालिक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या आनंदराव नाईक कॉलेजच्या प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, डॉ. प्रकाश दुकळे यांना बक्षीस देताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. अण्णासाहेब गुरव, डॉ. वासंती रासम.**

स्पर्धेत ७३ बिगर व्यावसायिक व १५ व्यावसायिक अशी एकूण ८८ महाविद्यालये सहभागी झाली. त्याचप्रमाणे स्पर्धेत १२७ विद्यार्थी व १६४ विद्यार्थिनी अशा एकूण २९१ विद्यार्थ्यांची वैयक्तिक पारितोषिकांसाठी निवड झाली असून, त्या बक्षिसांपोटी सुमारे ८७ हजार ४९८ रुपये इतक्या रकमेचे धनादेशाद्वारे वितरण करण्यात आले. बिगर व्यावसायिक गटात द्वितीय क्रमांक विवेकानंद महाविद्यालयाच्या 'विवेक' (संपादक डॉ. डी. ए. देसाई), तर तृतीय क्रमांक पाटण (जि. सातारा) येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या 'दौलत' (संपादक डॉ. बापूराव व्ही. जाधव) नियतकालिकाने पटकाविला.

व्यावसायिक गटात आष्टा (ता. वाळवा, जि. सांगली) येथील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजीच्या 'ज्ञानदा' (संपादक सचिन चव्हाण) नियतकालिकाने द्वितीय, तर जयसिंगपूरच्या डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या 'व्हर्व्ह' (संपादक प्रा. प्रशांत पाटील) नियकालिकाने तृतीय क्रमांक मिळविला. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विजेत्या महाविद्यालयांचे प्राचार्य व संपादकांचा फिरते चषक व प्रशस्तीपत्रे प्रदान करून गौरव करण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी आभार मानले.

याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. वासंती रासम, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, हिंदूराव पाटील, डॉ. शिरीष पवार, डॉ. व्ही. ए. रायकर, डॉ. ए. के. गुप्ता उपस्थित होते.

25 APR 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परिघाबाहेरील महाविद्यालयांनी स्पर्धेत उतरावे

## डॉ. डी. टी. शिर्के; नियतकालिक स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या नियतकालिक स्पर्धेला मिळणारा प्रतिसाद उत्साहवर्धक आहे. ही संख्या समाधानकारक असली, तरी अद्यापही स्पर्धेच्या परिघापासून दूर असलेल्या महाविद्यालयांनीही अशा स्पर्धेत सहभागी होण्याची गरज आहे, असे प्रतिपादन प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा २०१५-१६ च्या पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी ते बोलत होते. या स्पर्धेत बिगर व्यावसायिक गटात सर्वसाधारण विजेता पुरस्कार देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् अँड सायन्स कॉलेज, चिखली (ता. शिराळा, जि. सांगली) यांच्या 'अमर' (संपादक- डॉ. प्रकाश दुकळे) नियतकालिकाने, व्यावसायिक गटात सुशीला दानचंद घोडावत चॅरिटेबल ट्रस्टच्या संजय घोडावत ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, अतिग्रे (ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) यांच्या 'उमंग' (संपादक- योगश धुलुगडे) नियतकालिकाने प्रथम क्रमांक पटकाविला.

विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेत ७३ बिगर व्यावसायिक व १५ व्यावसायिक अशी ८८ महाविद्यालये सहभागी झाली. त्याचप्रमाणे स्पर्धेत १२७ विद्यार्थी व १६४ विद्यार्थिनी अशा एकूण २९१ विद्यार्थ्यांची वैयक्तिक पारितोषिकांसाठी निवड करण्यात आली. त्यासाठी बक्षिसांच्या सुमारे ८७ हजार ४९८ रुपये इतक्या रकमेचे धनादेशाद्वारे

पान २ वर»




**कोल्हापूर : बिगर व्यावसायिक गटात सर्वसाधारण विजेता पुरस्कार प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, डॉ. प्रकाश दुकळे. समवेत डॉ. वासंती रासम, डॉ. पी. डी. राऊत आदी.**

# परिघाबाहेरील महाविद्यालयांनी स्पर्धेत उतरावे

**(पान १ वरून)** वितरण करण्यात आले आहे. बिगर व्यावसायिक गटात द्वितीय क्रमांक कोल्हापूर येथील विवेकानंद महाविद्यालयाच्या 'विवेक' (संपादक- डॉ. डी. ए. देसाई) नियतकालिकाने, तर तृतीय क्रमांक पाटण (जि. सातारा) येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या 'दौलत' (संपादक- डॉ. बापूराव व्ही. जाधव) नियतकालिकाने पटकाविला.

व्यावसायिक गटात आष्टा (ता. वाळवा, जि. सांगली) येथील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजीच्या 'ज्ञानदा' (संपादक- सचिन चव्हाण) या नियतकालिकाने द्वितीय क्रमांक; जयसिंगपूरच्या डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या 'व्हर्व्ह' (संपादक-प्रा. प्रशांत पाटील) या नियकालिकाने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

यावेळी डॉ. शिर्के यांच्या हस्ते विजेत्या महाविद्यालयांचे प्राचार्य व संपादकांचा फिरते चषक व प्रशस्तीपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले.

स्वागत व प्रास्ताविक कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. सुस्मिता खुटाळे यांनी आभार मानले. यावेळी अधिष्ठाता डॉ. वासंती रासम, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, प्राचार्य डॉ. एस.आर. पाटील, हिंदुराव पाटील, डॉ. शिरीष पवार, डॉ. व्ही. ए. रायकर, डॉ. ए. के. गुप्ता आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
25 APR 2017 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. व्ही. ए. रायकर, संपादक योगेश धुळुगडे यांचा सत्कार करण्यात आला.

# शिवाजी विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेला प्रतिसाद

## डी. टी. शिर्के : चिखलीचे 'अमर', अतिग्रेचे 'उमंग' प्रथम

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या नियतकालिक स्पर्धेला मिळणारा प्रतिसाद उत्साहवर्धक असला, तरी जास्तीत जास्त महाविद्यालयांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

'शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा २०१५ १६'चा पारितोषिक वितरण समारंभ व्यवस्थापन परिषद सभागृहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

या स्पर्धेत बिगर व्यावसायिक गटात सर्वसाधारण विजेता पुरस्कार देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् अ‍ॅन्ड सायन्स कॉलेज, चिखली (ता. शिराळा, जि. सांगली) यांच्या 'अमर' (संपादक डॉ. प्रकाश दुकळे) या नियतकालिकाने, तर व्यावसायिक गटात सुशीला दानचंद घोडावत चॅरिटेबल ट्रस्टच्या संजय घोडावत ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, अतिग्रे (ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) यांच्या 'उमंग' (संपादक योगश धुळुगडे) या नियतकालिकाने प्रथम क्रमांक पटकावला.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाच्या या नियतकालिक स्पर्धेत ७३ बिगर व्यावसायिक व १५ व्यावसायिक अशी एकूण ८८ महाविद्यालये सहभागी झाली. त्याचप्रमाणे स्पर्धेत १२७ विद्यार्थी व १६४ विद्यार्थिनी अशा एकूण २९१ विद्यार्थ्यांची वैयक्तिक पारितोषिकांसाठी निवड करण्यात आली असून, त्या बक्षिसापोटी सुमारे ८७ हजार ४९८ रुपये इतक्या रकमेचे धनादेशाद्वारे वितरण करण्यात आले आहे.

बिगर व्यावसायिक गटात द्वितीय क्रमांक कोल्हापूर येथील विवेकानंद महाविद्यालयाच्या 'विवेक' (संपादक डॉ. डी. ए. देसाई) या नियतकालिकाने, तर तृतीय क्रमांक पाटण (जि. सातारा) येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या 'दौलत' (संपादक डॉ. बापूराव व्ही. जाधव) या नियतकालिकाने पटकावला.

व्यावसायिक गटात आष्टा (ता. वाळवा, जि. सांगली) येथील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजीच्या 'ज्ञानदा' (संपादक सचिन चव्हाण) या नियतकालिकाने द्वितीय क्रमांक, तर जयसिंगपूरच्या डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या 'व्हर्व्ह' (संपादक प्रा. प्रशांत पाटील) या नियकालिकाने तृतीय क्रमांक प्राप्त केला. यावेळी डॉ. शिर्के यांच्या हस्ते विजेत्या महाविद्यालयांचे प्राचार्य व संपादकांचा फिरते चषक व प्रशस्तिपत्र प्रदान करून गुणगौरव करण्यात आला. स्वागत व प्रास्ताविक कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
25 APR 2017 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्राचार्य ए. के. गुप्ता यांनी पारितोषिक स्वीकारले. यावेळी डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. एस. पाटील, ए. बी. घोलप यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# जयसिंगपूरचे जे.जे. मगदूम अभियांत्रिकी तृतीय

## शिवाजी विद्यापीठ संलग्न नियतकालिक स्पर्धेत यश

**जयसिंगपूर** : येथील डॉ. जे. जे. मगदूम अभियांत्रिकी महाविद्यालयाचे नियतकालिक 'व्हर्व'ने शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. याबद्दल प्राचार्य डॉ. ए. के. गुप्ता व प्रा. पी. पी.पाटील यांचा सत्कार व पारितोषिक वितरण शिवाजी विद्यापीठात पार पडला. याप्रसंगी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. एस. पाटील, रजिस्टार ए. बी. घोलप उपस्थित होते.

नियतकालिक स्पर्धेमध्ये डॉ. जे. जे. मगदूम अभियांत्रिकीच्या नियतकालिकाने गेली सलग पाच वर्षे शिवाजी विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेत प्रथम तीन क्रमांकाची पारितोषिके मिळवून आपला दर्जा कायम राखला आहे. गेली दहा वर्षे महाविद्यालयातील शेकडो विद्यार्थ्यांनी वैयक्तिक पारितोषिके मिळविली आहेत. शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून चांगल्या दर्जाची वाङ्‌मय निर्मिती व्हावी. सुप्त गुणांना वाव मिळावा, यासाठी महाविद्यालयामधून दरवर्षी नियतकालिके प्रकाशित केली जातात. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी उत्तम दर्जाचे नियतकालिक प्रकाशित व्हावे, या हेतूने शिवाजी विद्यापीठाकडून नियतकालिक स्पर्धा घेतल्या जातात. यंदाच्या नियतकालिकेत मगदूम अभियांत्रिकिने तृतीय क्रमांक पटकावल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष विजय मगदूम, उपाध्यक्ष ॲड. सोनाली मगदूम यांनी सर्वांचे अभिनंदन केले. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष

25 APR 2017 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : नीलम यादव व मानसी हुपरीकर (डावीकडे) यांचे अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत प्रा.डॉ. पी.एस. पाटील.

# शिवाजी विद्यापीठाच्या मानसी हुपरीकर, नीलम यादवचे यश

## दोन्ही विद्यार्थिनींना मिळाली परदेशात उच्चशिक्षणाची संधी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात शिकणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी आधुनिक ज्ञान, तंत्रज्ञानाच्या संधी खुल्या करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त सन २०१२मध्ये 'स्कूल ऑफ नॅनो सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी'ची स्थापना करण्यात आली. येथे बी.एस्सी.-एम.एस्सी. एकात्मिक अभ्यासक्रम सुरू झाला आणि या अभ्यासक्रमाच्या पहिल्याच बॅचच्या मानसी हुपरीकर या विद्यार्थिनीला जर्मनीमध्ये संशोधनाची संधी मिळाली आहे. तर बी.एस्सी.मध्ये शिकणाऱ्या नीलम यादव या विद्यार्थिनीला ३० लाखांच्या शिष्यवृत्तीसह फ्रान्समध्ये पुढील उच्चशिक्षणाची संधी मिळाली आहे. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

मानसी हुपरीकर सध्या एम.एस्सी. भाग-२ मध्ये शिक्षण घेत आहे. तिला जर्मनीमधील मारबर्ग येथील जगप्रसिद्ध फिलिप्स विद्यापीठात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक प्रा.डॉ. वोल्फगँग पारक यांच्याकडे इंटर्नशीप करण्याची संधी प्राप्त झाली आहे.

बी.एस्सी. भाग-३ मध्ये शिक्षण घेत असलेल्या नीलम यादव या विद्यार्थिनीला फ्रान्समधील पॅरिस-सुड विद्यापीठात पुढील पदव्युत्तर शिक्षणासाठी संधी मिळाली आहे. तिला पुढील दोन वर्षांसाठी तिला इरॅस्मस मुंडस ही सुमारे ३० लाख ६६ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळाली आहे.

**'सर्वसामान्य कुटुंबातील मुलींचे यश'**

नीलम यादव ही मूळची उत्तर प्रदेशातील असून तिचे वडील घनश्याम यादव हे पेंटर कॉन्ट्रॅक्टर आहेत. व्यवसायानिमित्त हे कुटुंब कोल्हापुरात स्थायिक झाले आहे. तिने सुमारे ३० लाख रुपयांची शिष्यवृत्ती मिळवून आईवडिलांच्या कष्टाचे चीज केले आहे. मानसी हुपरीकर हिचे वडील प्रमोद हुपरीकर हे इचलकरंजीच्या शाहू हायस्कूलचे मुख्याध्यापक आहेत, तर आई गृहिणी आहे.

जनसंपर्क कक्ष
25 APR 2017 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'अभियांत्रिकी' परीक्षांना प्रारंभ

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाकडून अभियांत्रिकी विद्या शाखेतील मेकॅनिकल, प्रॉडक्शन, सिव्हील, टेलिकम्युनिकेशन अशा विविध १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षांना सोमवारपासून प्रारंभ झाला. यातील पहिला टप्पा हा पुनर्परीक्षार्थींचा असून तो २८ एप्रिलपर्यंत चालणार आहेत.

परीक्षार्थींची संख्या सुमारे २० हजार इतकी असून, एक, तीन, पाच आणि सात या सत्रातील अभ्यासक्रमनिहाय परीक्षा पहिल्या टप्प्यात होणार आहेत. दुसऱ्या सत्रात दोन, चार, सहा आणि आठ या सत्राअंतर्गत नियमित विद्यार्थ्यांची परीक्षा होणार आहे. विद्यापीठाने प्रश्नपत्रिकांचे वितरण पूर्णपणे गोपनीय व नियंत्रित पद्धतीने सिक्युअर्ड रिमोट पेपर डिलिव्हरी (एसआरपीडी) करण्याची सुरूवात केली होती. त्याच्या यशानंतर ती विविध अभ्यासक्रमांना लागू केली.

नियमित आणि पुनर्परीक्षार्थी असे एकत्रितपणे सुमारे ८५ हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी या उन्हाळी सत्रात विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ३६ केंद्रांवरून परीक्षा देणार आहेत. या सत्रात अभियांत्रिकीच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांचे वितरण 'एसआरपीडी'द्वारे केले जाणार आहे. त्याची सुरुवात सोमवारपासून झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दिली.



## दृष्टीक्षेप

- २८ एप्रिलपर्यंत पुनर्परीक्षार्थींची परीक्षा
- नियमित आणि पुनर्परीक्षार्थी ८५ हजार विद्यार्थी
- ३६ केंद्रांवर होणार परीक्षा
- प्रश्नपत्रिकांचे वितरण 'एसआरपीडी'द्वारे